# क्विक हिलचे आरोग्य यान

**मुंबई** : ग्रामीण भागातील आरोग्य सेवा सुधारण्याकरिता आपली वचनबद्धता आणि सेवेला अधिक बळकटी देण्याकरिता, क्विक हील टेक्नोलॉजीज लिमिटेडची सीएसआर शाखा क्विक हील फाऊंडेशनने वाशिममधील अधिकाऱ्यांना दोन अत्याधुनिक वाहने आरोग्य यान सुपूर्द केली आहेत. यावेळी क्विक हील फाऊंडेशनच्या प्रमुख अनुपमा काटकर म्हणाल्या की, क्विक हील फाऊंडेशन भारताच्या ग्रामीण भागात अर्थपूर्ण योगदान देण्यासाठी कटिबद्ध आहे. वाशिम येथील जनतेची सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल आम्ही अधिकाऱ्यांचे आभार मानू इच्छितो. आरोग्य यान उपक्रमाद्वारे या भागातील लोकांच्या आरोग्य सेवाविषयक गरजा दीर्घकाळ पूर्ण करेल, असा आम्हाला ठाम विश्वास आहे. एक जबाबदार बिझनेस लीडर या नात्याने आम्ही उदात्त काम पुढे करतच राहू आणि भारतातील यशाची पुनरावृत्ती सुरूच ठेवू.